**पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा (मुख्य) परीक्षा- 2017**
**शारीरिक चाचणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या निकालाची घोषणा**

# घोषणा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दि.24 डिसेंबर, 2017 रोजी घेण्यात आलेल्या "**पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा (मुख्य) परीक्षा 2017**'' च्या लेखी परीक्षेतून '**शारीरिक चाचणीसाठी**' पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निकाल दि. 06 एप्रिल, 2018 रोजी जाहीर करण्यात आला आहे. या संबंधात शासन परिपत्रक गृह विभाग दि.4/4/2018 नुसार या निवडप्रक्रीयेतील 322 पदांसाठी आरक्षण लागू नसल्याचे शासनाने स्पष्ट केले आहे. त्यानुसार हा निकाल तयार करण्यात आला आहे. लेखी परीक्षेत अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या शारीरिक चाचणीचा कार्यक्रम लवकरच आयोगाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात येईल.

2.शारीरिक चाचणीस पात्र ठरणा-या उमेदवारांनी त्यांची मूळ प्रमाणपत्रे व सदर प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रतींचे दोन संच तसेच शासनाच्या संबंधित आस्थापना अधिकारी किंवा कार्यालय/विभागप्रमुख अधिकारी यांच्याकडून प्रमाणित करून घेतलेल्या '**परिशिष्ट-सात**' सह शारीरिक चाचणीस स्वखर्चाने उपस्थित राहावे. उमेदवारांना शारीरिक चाचणीचे पत्र त्यांच्या प्रोफाईलमध्ये उपलब्ध करुन देण्यात येतील.

3.अर्जात विजा(अ), भज(ब), विमाप्र, भज(क), भज(ड) व इमाव वर्गवारीचा दावा केला असल्यास अशा उमेदवारांनी आयोगातर्फे जाहिरात ज्या वित्तीय वर्षात (एप्रिल ते मार्च ) दिलेली असेल त्या पूर्वीच्या वित्तीय वर्षापासूनचे क्रिमीलेअरमध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेले नॉन क्रिमीलेअर (NCL) प्रमाणपत्र शारीरिक चाचणीच्यावेळी सोबत आणावे.

**दिनांक : 06 एप्रिल, 2018**

**सु. सं. केसरकर**
**उप सचिव (परीक्षा-2)**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**